# “ संशोधन प्रकल्प कसे मांडावेत ”

डॉ. स्वप्निल बुचडे

एम.ए., पीएच. डी., नेट, सेट (मराठी)

विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर

# संशोधन म्हणजे काय ?

- संशोधन हा शब्द इंग्रजीतील Re- Search या शब्दासाठी प्रतिशब्द आहे.
- **Re - म्हणजे** – पुन्हा
- **Search - म्हणजे** – शोध घेणे, पुन:पुन्हा शोध घेणे, झालेल्या संशोधनावर पुन:पुन्हा संशोधन करून नवीन तथ्य, नवीन सत्य आणि नवीन वस्तूस्थिती अभ्यासने म्हणजे संशोधन होय.
- सत्य शोधून काढणे आणि त्याद्वारे निर्णय घेणे हे बौद्धिक प्रक्रियेचे लक्षण समजले जाते. त्यासाठी संशोधन महत्त्वाचे आहे.

# संशोधनाची वैशिष्ट्ये

1. नवीन ज्ञान प्राप्त होते.
2. सूत्रबद्ध पद्धतीने संशोधन केले जाते.
3. ज्ञानाची कक्षा वाढते, उपलब्ध असलेल्या ज्ञानात सुधारणा केली जाते.
4. संशोधन हे वस्तूस्थितीवर आधारित व वस्तूस्थितीशी निगडीत असते.
5. संशोधन विशिष्ट प्रश्नांच्या संदर्भातील उत्तरे शोधण्याच्या दृष्टीने उपयुक्त ठरते.
6. संशोधन हे प्रयोगावर, निरीक्षणावर व माहितीवर अवलंबून असते.

## संशोधनाची गरज

- आधुनिक युग हे संशोधनाचे युग आहे. प्रत्येक व्यक्तिला निरनिराळ्या प्रकारची माहिती हवी असते.
- रोजच्या जीवनात नवनवीन प्रश्न निर्माण होतात. त्याच्याकडे दुर्लक्ष करून भागात नाही. उलट त्याच्या सोडवणुकीचे प्रयत्न करावे लागतात. हे प्रश्न व्यक्तीपुढे निर्माण होतात, तसेच ते विचारवंतांना देखील पडतात.

## संशोधन कधी

आपल्याकडे विद्यापीठीय पातळीवर (M.A., M.phil, Ph.D) संशोधन प्रक्रिया काय आहे हे विद्यार्थ्याला समते. पण अमेरिकेसारख्या राष्ट्रात त्या अनुषंगाने विद्यार्थ्यावर प्रथम पदवी स्तरावर संस्कार केले जातात.

## संशोधन प्रक्रियेचे प्रमुख टप्पे

१. संशोधनाची पूर्वतयारी होण्याच्या दृष्टीने करावयाची विविध कामे व विचारात घ्यावयाची अंगे.

२. प्रत्यक्ष तयारी करताना म्हणजे प्रकल्प सिद्धिस नेताना करावयाच्या बौद्धिक व तत्सम कृतिशी संबंधी गोष्टी.

३. शेवटच्या अवस्थेच्या दृष्टीने करावयाच्या विविध गोष्टी.

# संशोधनाचे टप्पे

१. विषय निवड – (योग्य -अयोग्य)

२. आराखडा

३. प्रशिक्षक – Guide

४. विषयाचा आवाका आणि मांडणी

५. प्रत्यक्ष विषयाची मांडणी

६. साधन – सामग्री संचयन : ग्रंथालयांचे साहाय्य (ग्रंथवाचन )

७. प्रकल्प लेखन करताना घ्यावयाची काळजी

## १. विषय निवड – (योग्य -अयोग्य)

- विषय निश्चितीसाठी पूर्ववाचन महत्त्वाचे
- विचार करून एक दोन विषय पुढे ठेवणे आवश्यक
- चांगला विषय सुचण्यासाठी दीर्घकाळ अवलोकन व चिंतन आवश्यक
- साधनग्रंथांचा अवलंब करावा. यामुळे पूर्वी काही काम झाले असल्यास त्याची कल्पना येते.

## ➢ विषय निश्चितीतील लक्षात घ्यायच्या गोष्टी

- योग्य विषय निवडावा. विषय सहज समजावा.
- विषय सापडत नसल्यास विषय तज्ञांचा सल्ला घ्यावा.
- एखादा विषय सुचवला गेला तरी आपल्या आवडी – निवडी व गरजेप्रमाणे विषय थोडा बदलून घ्यावा. आपल्याला आवड असलेली विषयाची बाजू स्वीकारावी.
- निवड केलेल्या विषयासंदर्भात आपल्याला कोणत्या पैलूंची मांडणी करायची आहे याचे ज्ञान आवश्यक आहे.
- आपली कुवत लक्षात घेवून विषयाची निवड करावी.

उदा. – गुऱ्हाळघर, सोशल मिडिया आणि तरुणाई, ऊस शेतकरी आणि त्याच्यासमोरील आव्हाने.

## ➢ विषयाचा आवाका लक्षात घ्यावा.

- ➢पदवी आणि विषयाचा आवाका याचे तारतम्य असणे आवश्यक आहे.

उदा. B.A., M.A. , M. Phil, Ph. D

- ➢ पदवीसाठी विषयाची व्यापकता लक्षात घेवून विषय निश्चित करावा.

## काय टाळावे

- ➢ प्रकल्प B.A. साठीचा आणि जिल्हा आणि राज्य पातळीवरील विषय घेणे टाळावे.
- ➢ किचकट आणि स्वत:ला समजणार नाही असा विषय घेवू नये.
- ➢ विषयाची निवड कोणाच्याही दबावाखाली येवून करू नये.
- ➢ संशोधन हा खेळ नव्हे हे लक्षात घ्यावे.

## गृहितकाला महत्त्व :

- गृहितक निश्चित केल्यानंतर प्रत्यक्ष त्याच्या अनुषंगाने शोधला सुरवात होते.

उदा. –१. मोबाईलच्या वापरामुळे तरुणाई बिघडली.

↓

यादृष्टीने प्रत्यक्ष असे घडले का याचा शोध घेणे. त्यामागची कारणे शोधणे.

↓

- गृहीतक सिद्ध होईपर्यंत ते खरे आहे असे संशोधक मानीत नाही.
- निष्कर्ष मनात बाळगून त्याच्या अनुषंगाने संशोधन करणे हे शास्त्रीय पद्धतीला अमान्य आहे.

# प्रशिक्षक – *Guide*

- संशोधनात मार्गदर्शकाची / प्रशिक्षकाची भूमिका अत्यंत महत्वाची असते.

I. संशोधन प्रगतीची कल्पना देणे.

II. पुढच्या कामाची रूपरेखा सांगणे.

III. काही शंका असतील तर त्या विचारने.

IV. तयार केलेल्या आराखड्यासंदर्भात चर्चा करणे.

## आराखडा

- विषयाच्या विवेचनासाठी आराखडा निश्चित करणे.
- संशोधनासाठीचा कालावधी, ज्ञानसाधनांची उपलब्धता, मांडणीसाठी लागणारा कालावधी, फिल्डवर्कसाठीचा कालावधी, सर्वेक्षण केलेल्या गोष्टींची मांडणी, या सर्वांच्या वेळेचे नियोजन आवश्यक असते.
- संशोधनातील पाठांचे उपमुद्दे करणे आवश्यक.

# साधन, सामग्री, संचयन : ग्रंथालयाचे साहाय्य

संशोधन विषयाच्या अनुषंगाने माहिती संकलन :

- विज्ञानात प्रयोगशाळेचा आधार घेतला जातो.
- सामाजिक शास्त्रे आणि भाषेसाठी ग्रंथालयांचा आधार घेतला जातो.
  - समाजशास्त्र, इतिहास या विषयांसाठी ग्रंथाऐवजी इतर मार्गांनी आपले साहित्य सिद्ध करावे लागते.

# ग्रंथवाचन

- पुस्तक वाचताना प्रथम पाहावयाची गोष्ट म्हणजे ते कितपत विश्वसनीय आहे हे पाहणे.
- ग्रंथ अद्ययावत आहे की नाही हे पाहावे.
- कित्तेक ग्रंथ जुने असले तरी ते प्रमाण म्हणून मानले जातात. याचे कारण त्याचे ग्रंथकार, मान्यवर ग्रंथकारांचे ग्रंथ अर्थातच अधिक विश्वसनीय असतात.
- पुस्तकाचे अवलोकन बारकाईने करावे. कोणताही महत्त्वाचा भाग नजरेतून सुटू नये ही काळजी घ्यावी.
- वाचनातून प्राथमिक मुद्दे तयार होतील ते नमूद करून ठेवावेत.
- विश्वकोश, तत्त्वज्ञानकोश, समाजविज्ञानकोश, चरित्रकोश, संज्ञासंकल्पनाकोश.. या कोशातून माहिती घ्यावी.

# प्रकल्पलेखन /प्रबंधलेखन करतानाची काळजी

- प्रास्ताविक रूपरेखा कोणत्या उद्देशाने तयार केली.
- विवेचनातले प्रमुख टप्पे
- प्रत्येक अवस्थेत कोणत्या आधारग्रंथांचा वापर करावा.
- प्रबंधाचे स्वरूप कसे असणार हे पाहावे.
- अवलंबिलेल्या पद्धतीतही आपले वैशिष्ट राहणार आहे. आवश्यक तेथे त्याचा खुलासाही करावा.

Thank you.